
संस्था स्थापना : १९६४ महाविद्यालय स्थापना : जून २०००

।। बहुजन हिताय बहुजन सुखाय ।।

किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर द्वारा संचलित –

# महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर–४१३५१५
# जि. लातूर

नॅक प्रमाणन 'ब' दर्जा






# आयडू

## 'जल साक्षरता' वार्षिक विशेषांक

२०२१–२२

**मुख्यसंपादक**
प्राचार्य डॉ. वसंत बिरादार

---

**संपादक**
उपप्राचार्य डॉ. डी.डी. चौधरी

---

**संपादक मंडळ**
डॉ. सतीश ससाणे
डॉ. अनिल मुंढे
डॉ. ए. एस. मोरे
प्रा. अतिश आकडे
डॉ. पी.डी. चिलगर
प्रा. परमेश्वर इंगळे
श्री पी. वाय. डोंगळीकर

---

**मुद्रित शोधक**
डॉ. मारोती कसाब

---

**टीप :** या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

### विद्यार्थी संपादक

**मराठी विभाग**
दिव्या राजीव दहीकांबळे

---

**हिंदी विभाग**
समृद्धी सुदास बनसोडे

---

**संस्कृत विभाग**
कोमल संभाजी पोले

---

**इंग्रजी विभाग**
गीता व्यंकटराव दोडे

---

**समाजशास्त्र विभाग**
ऐश्वर्या सुभाष रेचेवाड

---

**अर्थशास्त्र विभाग**
श्रीवाणी तिरुपती रागिरी

---


अक्षर जुळवणी
**अब्दुल अतिख**

---

**मुखपृष्ठ**
**सतीश कुलकर्णी**

---

**मुद्रक**
**सतीश कुलकर्णी**
मयूर प्रिंटर्स, कैलासनगर, नांदेड
mayur.ned@gmail.com





# प्राचार्यांचे मनोगत...!

सस्नेह नमस्कार !

किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीरने मराठवाड्यातच नव्हे तर महाराष्ट्रात आपली स्वतंत्र मुद्रा शैक्षणिक क्षेत्रात अधोरेखित केली आहे.करीत आहे.'बहुजन हिताय! बहुजन सुखाय!'या ध्येयाने प्रेरित होऊन आपला शैक्षणिक कार्यभाग साधत आहे.ग्रामीण भागातील, वाडी तांड्यांवरील, तळागाळातील, दीन, दलित, उपेक्षितांना, वंचितांना, कष्टकरी, सालदार, मजुरदार, यांच्यासह समाजातील सर्वच घटकांना त्यांना त्यांच्या हक्काचं शिक्षण मिळाले पाहिजे ही भूमिका किसान शिक्षण प्रसारक मंडळाची राहिलेली आहे.

शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीरने अहमदपूर येथे शैक्षणिक रोपटे लावले. आज त्याचा वटवृक्ष झाला आहे. प्राथमिक शिक्षणापासून ते पदवी पर्यंत शिक्षाणाची सोय टप्प्या टप्प्याने येथे उपलब्ध झाली. महात्मा फुले प्राथमिक विभाग, मराठी माध्यमांसह सेमी इंग्लिश, इंग्रजी माध्यम तसेच महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आणि इ. स. जून २००० मध्ये स्थापन झालेल्या महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूरने आज २२व्या वर्षात पदार्पण केले आहे. या दरम्यानच्या काळात महाविद्यालय हे विद्यापीठात अहमदपूरच्या शैक्षणिक क्षेत्रात 'अव्वल' स्थानावर आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या विद्यापीठीय परीक्षेत आमच्या

महात्मा फुले महाविद्यालयाचा विद्यार्थी तानाजी कांबळे हा इ.स.२०१६-२०१७ विद्यापीठात गुणानुक्रमे सर्व प्रथम आला. तसेच तो भूगोल या विषयात सर्व प्रथम येऊन गोल्डमेडलचा मानकरी ठरला.

इ.स.२०१७ -१८ मध्ये आमच्या महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. दीपाली परतवाघ हीने संस्कृत या विषयामध्ये सर्व प्रथम येऊन गोल्ड मेडलची मानकरी ठरली.

इ.स. २०१८-२०१९मध्ये कैलाश ससाणे हा विद्यार्थी विद्यापीठात सर्व द्वितीय आला.तसेच तो इंग्रजी आणि भूगोल या विषयामध्ये सर्वप्रथम येऊन इंग्रजी विषयात गोल्ड मेडलचा मानकरी ठरला.

इ.स. २०१९-२०२० मध्ये कु. अक्षता देवकते ही विद्यापीठात सर्व प्रथम तर हिंदी मध्ये श्रीरामे ज्ञानेश्वरी, राज्यशास्त्रामध्ये गुट्टे राजश्री व कुरेशी माजिद हे विद्यार्थी सर्वप्रथम येऊन सुवर्णपदकांचे मानकरी ठरले होते.

इ.स. २०२०-२०२१ मध्ये कु. पूजा चव्हाण ही विद्यापीठात सर्व प्रथम येऊन हिंदी, राज्यशास्त्र या विषयातील दोन पुरस्कारांसह गोल्ड मेडलची मानकरी ठरली. तसेच कु. रेणुका मलकापुरे ही विद्यार्थीनी संस्कृत विषयामध्ये सर्व प्रथम येऊन सुवर्ण पदकाची मानकरी ठरली.

महाविद्यालयाच्या गुणवत्तेची कमान ही सतत वृद्धिंगत होत आहे.

महाविद्यालयाच्या प्रगतीचे सर्व श्रेय हे किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व पदाधिका-यांचे डोळस मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची जिद्द, आणि उच्च विद्याविभूषित असलेले सर्व प्राध्यापकवृंदांचे अचूक व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन, तर शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गांच्या सहकार्याला जातेय.

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूरचा 'आसूड' हा वार्षिक अंक नियमितपणे दरवर्षी विविध शीर्षनामाने प्रकाशित होत असतो.याही वर्षी 'आत्मनिर्भर' या शीर्षकाखाली आम्ही तो प्रकाशित करीत आहोत. या मध्ये 'जल साक्षरता' हा विषय घेऊन पाण्याचा प्रत्येक थेंब कसा वाचवता येईल व त्यामधून पाणी बचत, साठवण कशी करावी हा संदेश देणारा हा आमचा वार्षिक अंक आहे. त्याचे आपण स्वागत कराल ही अपेक्षा!

धन्यवाद !

**प्राचार्य डॉ.वसंत बिरादार**
मुख्यसंपादक

# संपादकीय भूमिका...!



मराठवाड्यातीलच नाही तर महाराष्ट्रातील अग्रगण्य, नामांकित शिक्षण संस्था असलेल्या किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर या संस्थेने, अहमदपूर येथे महात्मा फुले शैक्षणिक संकुलात 'महात्मा फुले महाविद्यालय' इ.स. २००० पासून सुरू केले. हे महाविद्यालय, 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या संस्थेच्या ध्येयाने प्रेरित होऊन अहमदपूर व परिसरातील ग्रामीण, गोरगरीब, वंचित असलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण क्षेत्रात दर्जेदार व गुणवत्तायुक्त शिक्षण देण्याचे सेवा कार्य अविरतपणे करत आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या कार्यक्षेत्रात गुणवत्तेसह क्रीडा क्षेत्रात एक स्वतंत्र नावलौकिक प्राप्त करून 'फुले पॅटर्न' म्हणून आपली स्वत:ची वेगळी ओळख महात्मा फुले महाविद्यालयाने निर्माण केली आहे.

किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे सन्माननीय अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव व संस्थेचे सर्व मान्यवर पदाधिकारी, महाविद्यालय विकास समितीचे सर्व पदाधिकारी कल्पक व अनुशासनप्रिय प्राचार्य, कार्य समर्पित असलेले प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांचा विश्वास या पंचसूत्रीच्या आधारे महाविद्यालय वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये भरारी घेत आहे.

महाविद्यालयाचा क्रीडा विभाग, सांस्कृतिक विभाग, गुणवत्ता विकास विभाग, स्पर्धा परीक्षा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र यासारख्या वेगवेगळ्या विभागातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासह सर्वांगीण विकासाला चालना देण्याचा यशस्वी प्रयत्न विद्यार्थी केंद्रबिंदू मानून महाविद्यालयाने केलेला आहे.

महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना गुणवत्ता युक्त शिक्षणा सोबत त्यांच्या सर्वांगीण विकासाला, सुप्त कलागुणांना, त्यांच्यातील संशोधन कौशल्याला वाव देण्याचा प्रयत्न वेगवेगळ्या माध्यमातून केलेला आहे. त्यापैकीच 'आसूड' हा वार्षिक अंक होय. या वार्षिक अंकाच्या माध्यमातून दरवर्षी वेगवेगळ्या ज्वलंत विषयांवर विद्यार्थ्यांना लिहिते करण्याचे कार्य महाविद्यालय व 'आसूड' वार्षिक अंकाचे संपादक मंडळ, माननीय प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली

कार्य करत आहे. प्रतिवर्षी वेगवेगळ्या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना त्या विषयाचे आकलन व्हावे व विद्यार्थ्यांची त्या विषयाच्या अनुषंगाने असलेले ज्ञान व संशोधन कौशल्याला यांना एक मंच मिळावा यासाठी, दरवर्षी एक नवीन विषय घेऊन वार्षिकांक प्रकाशित केला जातो. या पूर्वी रोख विरहित अर्थव्यवस्था मॅग्नेटिक महाराष्ट्र, ज्याच्या हाती शून्य होते, शिक्षणातून स्वावलंबनाकडे या वेगवेगळ्या विषयावर वार्षिकांक प्रकाशित झालेले आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२१– २२ या वार्षिकांकासाठी महाविद्यालयाच्या संपादक मंडळाने, भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून शाश्वत विकासासाठी पाण्याचे महत्त्व लक्षात यावे या हेतूने 'जलसाक्षरता' या विषयावर हा विशेषांक प्रकाशित करण्याचा मानस निश्चित केला. विद्यार्थ्यांनी 'जलसाक्षरता' या विषयावर वेगवेगळ्या दृष्टिकोनातून आपले संशोधनात्मक विचार मांडण्याचा प्रयत्न केला. जलसंरक्षण, जलसंवर्धन व जलनियोजन या जलसाक्षरतेच्या त्रिसूत्रीतून विद्यार्थ्यांना प्रबोधित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. शासनाच्या जलसंवर्धनाच्या व जलसंरक्षणाच्या विविध योजना व वेगवेगळ्या जलतज्ज्ञांचे कार्य यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न या वार्षिक अंकातून विविध लेखांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी केलेला आहे. 'जलसाक्षरता ही काळाची गरज' आहे. जमिनीमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी असलेली स्त्रोते आज संपत आलेली आहेत. येणाऱ्या काळात होणारे महायुद्ध हे केवळ पाण्यासाठी होईल अशी भीती निर्माण झालेली आहे. अशा स्थितीत पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने व शाश्वत स्वरूपात कसा होईल यासाठी प्रत्येकाने जलसाक्षर होणे आवश्यक आहे. शासनाच्या 'पाणी आडवा पाणी जिरवा', 'कॅच द रेन', 'जलयुक्त शिवार' यासारख्या वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून पाण्याच्या संवर्धन व संरक्षणाविषयी जे प्रयत्न केले गेले आहेत ते जलसाक्षरता या विशेषांकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी समोर मांडण्याचा प्रयत्न या विशेषांकातून केलेला आहे. जलसाक्षरतेची माहिती व जलसाक्षरता आणि जलसंवर्धनासाठी व पाण्याच्या काटकसरीने वापरासाठी कृतसंकल्प होण्याच्या उद्देशाने हा छोटा प्रयत्न आहे. विश्वास आहे, आपण सर्व या विशेष अंकाचे स्वागत कराल.

या अंकाचा संपादक म्हणून संपादन करण्याची संधी मला दिल्याबद्दल मी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. वसंत बिरादार साहेब यांचे ऋण व्यक्त करतो. तसेच या अंकासाठी प्रेरणा व सहकार्य देणाऱ्या सर्वांचा मी ऋणी आहे. या अंकासाठी संपादक मंडळातील प्राध्यापक, विद्यार्थी तसेच इतर प्राध्यापक सहकाऱ्यांनी, प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी, विद्यार्थ्यांनी यासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य केले त्या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. हा अंक प्रकाशित करण्यासाठी मयूर प्रिंटर्सचे संचालक श्री सतीश कुलकर्णी व त्यांचे सहकारी यांनी जे सहाय्य केले त्या सर्वांचे आभार धन्यवाद.

संपादक
**प्रो. डॉ. डी. डी.चौधरी**
उपप्राचार्य

## अ । नु । क्र । म


- **जल साक्षरता** / मिसाळ उमा नामदेव, बी.ए. तृतीय वर्ष
- **जलसाक्षरता काळाजी गरज** / कदम शंकर रमाकांत, बी.ए. तृतीय वर्ष
- **जल साक्षरतेचे महत्त्व** / स्वामी सत्यशिला केरप्पा, बी.ए. प्रथम वर्षे
- **जल साक्षरतेची अपरिहार्यता** / कु. वैष्णवी मुंढे, बी.ए. प्रथम वर्ष
- **जल साक्षरता काल, आज आणि उद्या** / दिशा कोटंबे, बी.ए. प्रथम वर्ष
- **जल व्यवस्थापनाची गरज** / मेघा ससाणे, बी.ए. तृतीय वर्ष
- **पाणी म्हणजे अर्थातच जीवन !** / दोडे गीता, बी.ए. तृतीय वर्ष
- **'जल प्रदूषण '** / कु. वर्षाराणी किशनराव नरवटे , बी.ए. द्वितीय वर्ष
- **'जलप्रदूषण को दूर करने के उपाय '** / कु.मुसळे अल्का पंडित, बी.ए. तृतीय वर्ष
- **जलम्एवंजीवनम्** / कु. केजकर गीतांजली, बी.ए. (तृतीयवर्ष)
- **जलसंधारणस्यमहत्वम्** / कु.पोले कोमल संभाजी, (बी. ए. तृतीय वर्ष)
- **Water Resources /** Chaus Sumiya A.Rauf, B.A. Third Year
- **Water Literacy: Dire need of the hour /** Kambale Dhanshree, B.A.S.Y.
- **Needs and Importance of Water Conservation** / Kambale Samiksha, B.A.T.Y.

## ।। महाविद्यालय गीत ।।

क्रांतिसूर्य जोतिबांच्या लेखणीमधली ही शिक्षण वाणी ।
ज्ञानमंदिरी भारतभूमी दिसे शोभुनी ।।धृ।।
सर्वांचा निर्मिक एक जानी
माणूस इथला आत्मज्ञानी
सत्याने वर्तावे सद्‌गुण मानी
ज्ञानचक्षु विद्यार्थी इथे अभिमानी
ज्ञानदीप लावुनी तेवत ठेवुया मनोमनी ।।१।।
घेवुनिया वसा जोतिबांचा
ठेविला आदर्श सावित्रीचा
फुलला मळा शिक्षणाचा
मिळाला आधार किसान शिक्षण मंडळाचा
फुले महाविद्यालयाचे रोप लाविले दूरदृष्टीने ।।२।।
बालाघाटच्या डोंगर रांगा
मन्याड खोऱ्यात फुलती ज्ञानबागा
शिक्षण क्रांतीचा गुंफला धागा
माणूस इथला सदैव जागा
फुले पॅटर्नचा झरा वाहे शिक्षण पंढरीतुनी ।।३।।
शिक्षण ज्ञान विज्ञानाचे
मानवतेचे गुणवत्तेचे
जिजाऊ, सावित्री अन् अहिल्याबाईंचे
स्वराज्य स्थापण्या शिवरायांचे
'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' चा
ध्यास घेऊनी मनोमनी ।।४।।
विद्यार्थी सारी मिळूनी राहती
एकतेचे गीत गाती
ज्ञानदिव्यांच्या पेटवून वाती
शूरवीरांचे गुण गाती
शब्दरत्नांच्या अलंकाराने दिसते शोभुनी ।।५।।

**– प्रो. डॉ. अनिल मुंढे**



# जल साक्षरता

■ **मिसाळ उमा नामदेव**
बी.ए. (तृतीय वर्ष)

पृथ्वीवरील पाणी हेच जीवन आहे, असे म्हटले तरी ते चूक ठरणार नाही. पृथ्वीवर पाणी नसते, तर जीवसृष्टी निर्माणच झाली नसती. पाण्यामुळे पृथ्वीवर सजीव आजवर टिकून आहेत. 'जल है तो  कल है!' असे घोषवाक्य आपण अनेकदा ऐकतो. पाणी संपले तर कदाचित संपूर्ण पृथ्वीवरचे जीवन नष्ट होईल. पृथ्वीवरील उपलब्ध पाण्यापैकी ०.९ टक्के पाणीच नद्या सरोवरे, विहिरी, तलाव यांमध्ये उपलब्ध आहे. त्याचाच उपयोग आपल्याला करावा लागतो. लोकसंख्यावाढ, शहरीकरण, गरजांमधील वाढ या गोष्टी पाणी टंचाईला कारणीभूत ठरतात. एक दिवस असा येईल की पाण्याची  किंमत खनिज तेलापेक्षा जास्त असेल, येणारा भविष्य काळ आपल्याला तिसरे महायुद्ध पाण्यासाठी दाखविल अशी तज्ज्ञांची मते आपल्याला उद्याचे विदारक रूप दाखवतात. पाणीरूपी अमृताचा अपव्यय टाळण्यासाठी योग्य ती काळजी घेण्याची सवय प्रत्येकाने लावली पाहिजे. भारतात जलप्रदूषणाची मोठी समस्या आहे.

औद्योगिकीकरणामुळे नद्या नाले प्रदूषित केल्या जातात. मोठे मोठे कारखाने पाण्याचा वाटेल तसा वापर करून त्याची नासाडी करतात. घरात अथवा सार्वजनिक ठिकाणी पाण्याचे गळके नळ किंवा वापरानंतर तसेच, चालू ठेवलेले नळ हे पाण्याच्या अपव्ययाला कारणीभूत ठरतात. पाणवठ्यावरील अस्वच्छताही पिण्यायोग्य पाण्याचे प्रदूषण करते. सणांमध्ये मूळ परंपरा बाजूला ठेवून उगाच पाण्याचा अपव्यय केला जातो. नद्यांमधून चालणारी जलवाहतूकही पाण्याची नासाडी करण्यास कारणीभूत ठरते. या सर्व  कारणांमुळे आज पिण्यायोग्य पाण्याचे साठे अत्यंत मर्यादित झाले आहेत. अनेक शहरे, गावे पाणीटंचाईची भीषण समस्या अनुभवत आहेत. पाण्यासाठी मैलोन मैलांची  पायपीटही करावी लागत आहे. शेतीला पाणी नसल्याने ती ओसाड ठरत आहे. धरणांमधील पाणीसाठा आता अपुरा पडू लागला आहे मनुष्य आणि इतर प्राणीही या पाणीटंचाईला बळी पडत आहेत.

**जलप्रदूषणाची कारणे :**

जलप्रदूषणाचे एक प्रमुख कारण म्हणजे उद्योगधंदे आणि व्यवसाय. आपले उद्योग आणि कारखान्यामधून निघणारा रासायनिक कचरा थेट

नद्या व तलावांमध्ये टाकला जातो. नद्यामध्ये आणि तलावामध्ये सोडला जाणारा हा कचरा खूप विषारी असतो आणि त्यामुळे नद्यांचे पाणी, तलावांचे पाणी विषारी होते.

नद्यांचे व तलावांच्या पाण्याचे दूषितीकरण झाल्यामुळे त्यामध्ये राहणाऱ्या जलचर प्राण्यांचे जीवन धोक्यात येते आणि हे पाणी पिण्यायोग्य नसल्याने आपल्याला पाणीटंचाईचा सामना देखील करावा लागतो आणि अनेक आजारांना तोंड द्यावे लागते त्यामुळे आपले आरोग्य धोक्यात येते. उद्योगांव्यतिरिक्त पाण्याची प्रदूषण होण्याची आणखीही अनेक कारणे आहेत.

काही ठिकाणी लोक दैनंदिन कचरा देखील नद्या, नाले व तलावांमध्ये टाकतात. आज लोक शेतीत रासायनिक खते आणि किटकनाशके देखील वापरतात, ज्यामुळे पाण्याचे स्त्रोत मोठ्या प्रमाणात प्रभावित झाले आहेत. जेव्हा नद्यांचे दूषित पाणी समुद्रात येते तेव्हा समुद्राचे पाणीही दूषित होते.

प्लास्टिकचा वापर वाढल्यामुळे लोक प्लास्टिकही नद्यांच्या पाण्यात टाकतात त्यामुळे प्लास्टिकचा ढीग जमा होऊन नद्यांमध्ये गाळ साचतो आणि शहरात पूर येण्याची शक्यताही वाढते. कधी कधी जेव्हा एखादा अपघात होतो तेव्हा जहाजांचे तेल समुद्रात पसरते, ज्यामुळे समुद्राचे पाणी दूषित होते हे तेल समुद्रात सर्वत्र पसरते आणि जलचरांचे जीवन धोक्यात येते. लोक नदी किंवा तलावाजवळ कपडे व भांडी धुतात, त्यामुळे नदी आणि तलावांचे पाणी दूषित होते.

**पाण्याचे महत्त्व :**

पाणी ही निसर्गाने दिलेली सर्वात मोठी देणगी आहे. त्यामुळे पाणी एक नैसर्गिक संसाधन आहे. पाणी हे सर्व सजीवांसाठी आणि निसर्गासाठी अत्यंत उपयुक्त आहे. या मुळे माणसाच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. पाणी औद्योगिक क्षेत्रामध्ये सुद्धा वापरले जाते. एवढेच नसून पाण्यापासून ऊर्जा निर्मिती सुद्धा केली जाते, पाण्याची सर्वात मोठी गरज भासते ती म्हणजे शेती करण्यासाठी कारण मानव पाण्याशिवाय कुठलेही पीक घेऊ शकत नाही, त्यामुळे मानवाच्या जीवनामध्ये पाण्याला खूप महत्त्वाचे स्थान आहे.

मानवाला जेवढी पाण्याची गरज आहे तेवढीच गरज वनस्पतींना सुद्धा आहे. कारण झाडे आपल्या मुळांच्या माध्यमातून जमिनीतील पाणी शोषून घेतात आणि वनस्पतीच्या इतर शाखांपर्यंत पोहोचवतात. तसेच झाडाच्या खोडामध्ये पाणी साठवले जाते. थोडक्यात सांगायचे म्हणजे झाडांना वाढण्यासाठी सर्वात जास्त गरज असते ती म्हणजे पाण्याची. मुख्यत: झाडांपासून आपल्याला फळे – फुले, लाकूड, औषधी उपचार मिळतात, मग झाडे आपल्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत आणि या झाडांना उपयुक्त आहे ते म्हणजे पाणी.

आपल्या अवतीभोवती अनेक कारखाने, व्यवसाय चालत आहेत. आणि यातून मिळणाऱ्या आर्थिक मदतीमुळे मनुष्य आपला उदरनिर्वाह करत आहेत. परंतु या औद्योगिककरणांमधील काही उद्योगधंदे असे आहेत ज्यासाठी अत्यंत आवश्यक असते ते म्हणजे पाणी. अशा उद्योगधद्यांना पाणी नसेल तर ते उद्योगधंदे ठप्प होऊ शकतात. त्यामुळे औद्योगिक करणांमध्ये देखील पाण्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

**पाणी संवर्धन :**

पाणी हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. प्रत्येक सजीवाला आपले जीवन जगण्यासाठी पाण्याची अत्यंत आवश्यकता असते. त्यासाठी पाणी


संवर्धन करणे हे गरजेचे आहे. पाणी हे एक अमूल्य संसाधन आहे. ज्याचा वापर आपण जितक्या काटकसरीने करू; तेवढा आपल्या भविष्यामध्ये पाण्याचा साठा उपलब्ध राहील, अन्यथा येणाऱ्या पिढीला पाण्याची कमतरता भासू शकते. त्यासाठी प्रत्येक मनुष्याने पाणी संवर्धन करणे गरजेचे आहे. यासाठी प्रत्येक मनुष्याने पाणी व्यर्थ घालू नये.

माणसाने पाण्याचा उपयोग आवश्यकतेनुसार आणि गरजेनुसारच करावा. जेव्हा आपण कुठलेही भाजी किंवा फळे धुतो तेव्हा ती एखाद्या भांड्यामध्ये पाणी घेऊन धुवावी. जेणेकरुन पाणी बचत होईल. तसेच पावसाचे पाणी टाकी किंवा खड्डयांमध्ये साठवून ठेवावे. तसेच आपल्या आसपासच्या परिसरातील नदी नाले यांमध्ये दूषित पाणी सोडले जाणार नाही किंवा तेथील पाणी दूषित केले जाऊ नये याकडे लक्ष दिले पाहिजे.

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामध्ये पाण्याचा एक थेंब अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यासाठी पाणी हे जपून वापरले पाहीजे, पाण्याचा काटकसरीने वापर केला पाहीजे. पाण्याशिवाय कोणताही सजीव जिवंत राहू शकत नाही यामुळेच म्हणतात, ''पाणी हेच जीवन.''

दररोज भाजी करण्यापूर्वी ती धुण्यासाठी पाणी वापरतो. जवळपास लिटरभर पाणी त्यात जाते. ते कुंड्यांना किंवा झाडांना वापरा. कपडे धुण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाणी वापरले जाते. ते पाणी ही नालीतच जाते. त्याऐवजी ते पाणी अंगणात शिंपडण्यासाठी वापरु शकतो. पाण्याचे नळ सुरु ठेवून तोंड धवू नका. शॉवर, फ्लशचा वापर टाळा. नळाची गळती असेल तर दुरूस्त करा. वाहने धुताना कमी पाणी वापरा.

◆◆◆



# जलसाक्षरता काळाजी गरज

■ **कदम शंकर रमाकांत**
बी.ए. (तृतीय वर्ष)

पाणी वाचवणे आता अतिशय जरुरीचे झाले आहे, कारण देशात सगळीकडे पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. मुंबई, पुणे सारख्या मोठ – मोठ्या शहरात फार मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई दिसून येते. तर छोट्या छोट्या खेड्यातील हाल पहायलाच नकोत. तिथे तर टँकरने पाणी आणलेलेही पुरत नाही. पाण्याने आपले सगळे आयुष्य व्यापून टाकले आहे. अशा या पाण्याचे योग्य जतन, बचत करणे आणि त्याचा योग्य वापर करणे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

आपण पाणी कुठे वाया घालवतो त्याचा अभ्यास करण्याची वेळ आली आहे. पाण्याचे मूळ आणि ऋषीचे कूळ विचारू नये म्हणतात. पण आता पाण्याचे मूळ शोधण्याची वेळ आली आहे. आपली पृथ्वी ६० टक्के पाण्याने व्यापलेली आहे. त्यात फक्त २.५ टक्के गोड पाणी आहे. पाण्यावरच हे सृष्टीचक्र फिरत आहे. आपण पाण्याशिवाय पृथ्वीची कल्पनाही करु शकत नाही. निसर्गाची नासाडी थांबवणे आता आपल्या हातात आहे. जागतिक तापमान वाढीमुळे जगात चिंतेचे वातावरण पसरले आहे. त्या तापमान वाढीला आपण हातभार न लावणेच बरे. नाही का ?

अन्नाशिवाय एखादा माणूस महिनाभर जगू शकतो. पण पाण्याशिवाय काही दिवसही जगणे केवळ अशक्य आहे. म्हणून असे म्हणावे वाटते की

*'पाण्यात कपात करा'*

नाहीतर....

*'कपात पाणी मिळेल !!'*

आपल्या शरीरात ८५टक्के पाणी असते. शरीरातील रक्तामध्ये ९२टक्के पाणी असते शरीरातील ठिकठिकाणच्या सांधेजोडीत वंगण म्हणून शरीराच्या तापमानाच्या नियंत्रणासाठी पाण्याची गरज असते. त्यासाठी पाण्याचे विशिष्ट प्रमाण आपल्या शरीरात असणे आवश्यक आहे. नाहीतर 'डिहायड्रेशन'चा धोका असतो. आपले आरोग्य चांगले राखण्यासाठी पाणी उकळून, गाळून, आणि कोमट किंवा फिल्टर करुन पिणे गरजेचे असते. पिण्यासाठी अनेकजण बाटलीबंद पाणी वापरतात. जगभरात प्लास्टिक विरोधी वातावरण असताना शुद्ध पाणी दिले जात

असल्याचा दावा केला जातो. पण शुद्ध पाणी ज्या प्लास्टिक बाटलीमधून दिले जाते. त्याचे प्लास्टिक चांगल्या दर्जाचे नसते. बऱ्याचदा या बाटल्या दुय्यम आणि कनिष्ठ दर्जाच्या प्लास्टिकपासून तयार केलेल्या असतात.

त्यामुळे त्यातील पाणी अशुद्ध होऊन ते पिण्यासाठी अयोग्य ठरते. त्यामुळे आपल्या शरीरास हानी पोहचू शकते.

घराघरात फ्रिजमध्ये पाणी भरून बाटल्या ठेवण्याची पद्धत आहे. पण या बाटल्या आठवड्यातून एकदा तरी धुतल्या जातात का हाही एक संशोधनाचा विषय आहे.

आपल्या दैनंदिन जीवनातही थोडा विचार करून योग्य नियोजन करुन पाण्याचा दुरुपयोग टाळू शकतो. पण त्यासाठी काय केले पाहीजे.

उन्हाळ्याच्या दिवासात २ वेळा 'वॉश' घेणारेही अनेकजण असतात. त्यासाठी ५० ते १५० लिटर शुद्ध पाणी वापरले जाते. रोजचे कपडे धुण्यासाठी ४० ते १७० लिटर पाणी वापरले जाते. उच्च मध्यमवर्गीय आणि उच्च कुटुंबात पाश्चात्य पद्धतीची स्वच्छतागृहे असतात. त्यासाठी १२ लिटर शुद्ध पाणी प्लशद्वारे सोडून टाकले जाते. हे पाणी साठवून शौचकुपात 'फ्लश' ऐवजी वापरता येईल. खूप जण दात घासताना बेसिनच्या नळाला चालूच ठेवतात. खूप ठिकाणी रस्त्यायावर पाणी मारतांना दिसून येतात पण त्याचा काहीही फायदा नाही मग का पाणी वाया घालतात काय माहीत? अशा प्रकारे जर आपण पाणी वाया घालण्याचे कार्य करत असाल तर त्यावर मला असे म्हणावे वाटते की,

''केलेली पापं जर<br>
पाण्याने धुतली जातात तर<br>
त्याच पाण्याचं संवर्धन करुन<br>
पुण्य कमवायला<br>
काय हरकत आहे.... !!''

आपण सर्व जण वर्षातून एकदा तरी देवाला जात असतो जसे की पंढरपूर, आळंदी इ सारख्या ठिकाणी आपण देवाच्या दर्शनासाठी जातो. गेल्यानंतर चंद्रभागेमध्ये आंघोळ करतो. कारण असे म्हणतात कि चंद्रभागेत आंघोळ केल्याने सर्व पाप धुवून जातात.

मग ते जर खरे असेल आणि तुमची सर्व पाप जर धुवून जावे असे तुम्हाला वाटत असेल तर आपल्या जीवनात पाणी हे योग्य प्रकारे वापरण्याचे कार्य करा. तुम्हाला चंद्रभागेत जाऊन किंवा देवाच्या मंदिरात जाऊन पुण्य कमवण्याची काहीही आवश्यकता नाही. पाणी योग्य प्रकारे वापरा. तुम्ही वापरा; इतरांना ही सांगा. यातच तुमचे पुण्य आहे.

नदी आणि पाणी ह्यांचे अनन्यसाधारण महत्त्व मान्य करुन आपल्या पूर्वजांनी नद्यांना माता आणि देवत्व बहाल करुन पापनाश पुण्यवर्धक संकल्पना रुजवल्या आहेत. त्यामुळे निर्माल्य, देहदहन संस्कारविधी असे कितीतरी त्याज्य पदार्थ नदीस अर्पण होऊ लागले आहेत. नदी काठी जत्रा भरविणे, यात्रा, मेळावे, कुंभमेळा यांचे आयोजन केले जाते. त्यामध्ये हजारो लाखोंच्या संख्येने लोक जमतात. त्याची दिनचर्या भांडी, कपडे, स्नान, सगळे नदीकाठीच चालते. त्याद्वारे नदीचे पाणी दूषित होण्यास सुरूवात होते. पावसाचे आकाशातून पडणारे पाणी शुद्ध स्वरुपातच असते. पण जसे ते जमिनीवर पडून वाहू लागते, त्यात माती, कचरा, वातारणातील वायू मिसळतात.

आपल्याला पाणी मिळविण्याचा खात्रीशीर स्त्रोत म्हणजे पाऊस. त्याच्या लहरीपणावर आपले जीवन अवलंबून आहे. तो वेळेवर आला तर आपण आनंदी

होतो, पण ओढ दिली तर सचिंतीत होतो. जमिनीवर पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब अडविणे आणि जिरविणे गरजेचे आहे. त्यासाठी जलपुनर्भरण आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी त्यांच्या जमिनीत पडणाऱ्या आणि शहरी भागात राहणाऱ्या प्रत्येकाने आपल्या परिसरात पडणाऱ्या पावसाच्या पाण्याला थांबवून अडविणे आवश्यक आहे. शेतात, शेततळी, बांध बांधून आणि शहरी भागात रेन वॉटर हार्वेस्टिंग म्हणजे छतावर पडणारे पाणी साठविता येईल. आपल्या घराच्या अंगणात मोठा हौद बांधून त्यात छतावर पडणारे पाणी साठवता येते. वृक्षतोड थांबवून मोठ्या प्रमाणात झाडे लावली पाहिजेत. झाडे पाणी वाहण्याच्या वेगावर मर्यादा घालतात. पाणी आपल्या जीवनात खूप महत्त्वाचे आहे. आई, वडील, बहीण, भाऊ, पत्नी इ. पैकी आपल्या जीवनात कोणीही नसले तरी माणूस जास्त दिवस जगू शकत नाही. म्हणून पाण्याचा योग्य प्रकारे वापर करा आपल्या प्रत्येकाला पाण्याचा काटकसरीने वापर करणे, पाण्याचा पुनर्वापर करणे, जलप्रदूषण टाळणे आणि शुद्ध पाणी प्राशन करणे आवश्यक आहे.

पाणी कसे वापरावे कसे वाचवावे याचा सुंदर प्रकारे संदेश देणारी कविता

*'पाणी वाचवा*
*झाडाविना ढग गेले,*
*ढगाविना गेले पाणी,*
*जिवंत न राहिल रे कुणी,*
*जेव्हा नसेल पृथ्वीवर पाणी.*

*पाण्याविना शेती गेली,*
*तहानलेल्यांचा वाली न कोणी*
*लोक सारे हवालदिल झाले,*
*वृक्षतोडीने अनर्थ केले,*

*पृथ्वीचेही वाळवंट झाले,*
*ऋतुचक्र पण बदलून गेले.*
*साठवून ठेवा सांडपाणी,*
*वृक्षांना ते द्या टाकुनी.*

*लागेल तेवढेच वापरा पाणी,*
*नका करु तुम्ही मनमानी*
*पाणी हेच जीवन आहे,*
*म्हणून सारे वाचवा पाणी.'*

***– डी. एच. राठोड***
*(वडनेर)*

◆◆◆



# जल साक्षरतेचे महत्त्व

■ स्वामी सत्यशिला केरप्पा
बी.ए. (प्रथम वर्ष)

पाणी वाचवणे आता गरजेचे झाले आहे. कारण देशात सगळीकडे पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. मुंबईसारख्या शहरातली पाणी टंचाई आहे, तर छोट्याछोट्या खेड्यातील हाल पहायलाच नकोत. तिथे तर टँकरने पाणी आणलेलेही पुरत नाही. पाण्याने आपले सगळे आयुष्य व्यापून टाकले आहे. अशा या पाण्याचे योग्य जतन, बचत करणे आणि त्याचा योग्य वापर करणे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपण पाणी कुठे वाया घालवतो त्याचा अभ्यास करण्याची वेळ आली आहे.

पाण्याचे मूळ आणि ऋषीचे कूळ विचारु नये म्हणतात. पण आता पाण्याचे भ्या शोधण्याची वेळ आली आहे. आपली पृथ्वी ७० टक्के पाण्याने व्यापलेली आहे. त्यात फक्त २५ टक्के गोड पाणी आहे. पाण्यावरच हे सृष्टीचे चक्र फिरत आहे, आपण पाण्याशिवाय पृथ्वीची कल्पनाही करु शकत नाही. निसर्गाची नासाडी थांबवणे आता आपल्या हातात आहे. जागतिक तापमान वाढीमुळे जगात चिंतेचे वातावरण पसरले आहे. त्या तापमाज वाढीला आपण हातभार न लावलेच बरे नाही का ? अन्नाशिवाय एखादा माणूस महिनाभर जगू शकतो पण पाण्याशिवाय काही दिवसही केवळ अशक्य आहे. कारण आपल्या शरीरात ८५ टक्के पाणी असणे शरीराच्या विविध अवयवांच्या चलनवलणात पाण्याचे महत्त्व मोठं आहे. त्यासाठी शुद्ध पाण्याची आवश्यकता आहे. शरीरातील रक्तामध्ये ९२ टक्के पाणी असते. शरीरातील ठिकठिकाणच्या सांधेजोडीत वंगण म्हणून शरीराच्या तापमानाच्या नियंत्रणासाठी पाण्याची गरज असते. त्यासाठी पाण्याचे विशिष्ट प्रमाण आपल्या शरीरात असणे आवश्यक आहे नाहीतर

डिहायड्रेशनचा धोका असतो.

आपले आरोग्य चांगले राहण्यासाठी पाणी उकळून, गाळून आणि गार करुन किंवा फिल्टर करुन पिणे गरजेचे असते पिण्यासाठी अनेकजण बाटलीबंद पाणी वापरतात. जगभरात प्लास्टिक विरोधी वातावरण असताना शुद्ध पाणी दिले जात असल्याचा दावा केला जातो. पण शुद्ध पाणी ज्या प्लास्टिक बाटलीमधून दिले जाते त्याचे प्लास्टिक चांगल्या दर्जाचे नसते बऱ्याचदा या बाटल्या दुय्यम आणि घातक दर्जाच्या प्लास्टिक पासून तयार केलेल्या असतात. त्यामुळे तयार केलेल्या असतात. त्यामुळे त्यातील पाणी अशुद्ध घेऊन ते पिण्यासाठी आयोग्य असते. घरघरात फ्रिजमध्ये पाणी भरुन बाटल्या ठेवण्याची पद्धत आहे. शेतीसाठी पाणीवापर करताना तुषार अथवा ठिबक प्रणालीचा वापर बंधनकारक असावा. भूगर्भातील जलसाठ्याचे पुनर्भरण न करता पाणी उपसणे हा गंभीर गुन्हा समजला जावा पाणीसाठ्याला बाष्पीभवनाने होणारी हानी कमी खर्चिक असेल. तरीही आवश्यक आहे. डोंगरमाथ्यापासून पायथ्याकडे वाहणारे पाणी अडविण्यासाठी सोपे आणि योग्य उपचार करणे गरजेचे आहे.

पावसाच्या अखेरीस उघड्या नाल्यातून वाहणारे पाणी अडविण्यासाठी वनराई अगर तत्सम बंधारे उपयुक्त आणि किफायतशीर ठरतात.

लोकसंख्या ११५ कोटींवर स्थिर व्हायला, तसेच अनुद्यात्पादक गुरांची संख्या नियंत्रित करता यावी यासाठी राष्ट्रीय मतैक्य घडवून आणावयास हवे.

छपरांवर पडणाऱ्या पाण्याचा थेंब अन थेंब, साठवून पिण्यासाठी तसेच इतर कामासाठी वापरला जावा यासाठी देशव्यापी मोहिम राबविण्यात यावी.

पाण्यात घरगुती अगर शेतीकामासाठी पुनर्वापर करणे सक्तीचे पाहिजे.

◆◆◆

# जल साक्षरतेची अपरिहार्यता

■ कु. मुंढे वैष्णवी
बी.ए. (प्रथम वर्ष)

व्यक्तीगत पातळीवर पाण्याचा वापर – लाखो, करोडो सुशिक्षित कुटुंबात सकाळी कितीतरी लिटर पाणी शिळे झाले म्हणून गटारात टाकण्यासाठी मोरीत सोडले जाते. परंतु जलाशयात महिनो न् महिने साठविलेले पाणी नळाच्या तोटीतून घरात ताजे पाणी म्हणून प्रवेश करते, हे ओरडून सांगणे म्हणजेच जलसाक्षरता.

जे पाण्याचा विचार करतात, ते जीवनाचा विचार करतात. कारण पाणी म्हणजे जीवन आणि जीवन म्हणजे पाणी. एवढे अनन्यसाधारण महत्त्व असलेले हे पाणी म्हणजे पंचमहाभूतांपैकी एक, आग विझविणारे पाणी, पण आता पाण्यासाठी माणसाची मने पेटू लागली तर विझवायची कशाने ? थोडक्यात गरजेपेक्षा पाणी कमी पडणार आणि त्यामुळे तंटे होणार. जाणकार मंडळी जसे म्हणतात, की यापुढे होणारे महायुद्ध पाण्यासाठी होणार.

तरीही भविष्यात निर्माण होणाऱ्या या जलसंकटावर मात करण्यासाठी पाण्याबद्दल जेवढे ज्ञान लोकांपर्यंत पोचविता येइल तेवढे पोचविले पाहिजे. ज्ञानामुळे समस्या सुटतात. अज्ञानामुळे काहीही घडू शकते. खरेच पाण्याबद्दल लोकांना ज्ञान कमी आहे का ? ज्ञान कमी आहे असे म्हणणेही योग्य वाटत नाही. सामाजिक बांधिलकीचे विस्मरण होत चालले आहे आणि त्यासाठी जलसाक्षरतेची नितांत गरज आहे. पाणी त्याच्या उपलब्धतेच्या सहजतेमुळे आणि त्याच्या अतिपरिचयामुळे क:पदार्थ मानण्याची विचारधारा बदलण्यासाठी समाज जलसाक्षर करावा लागेल. विचार – आचारांना, आचार – सवयींना, सवयी – स्वभावांना, स्वभाव – व्यक्तींना आणि व्यक्ती सर्व समाजाला बदलतील म्हणून विचारधारेवरच संस्काराचे शिंपण करुन जलसाक्षर समाज घडविण्यासाठी सुरुवात करावी लागेल.

**पाण्याची उपलब्धता :**

शुद्ध पाणी एक दुर्मिळ नैसर्गिक वस्तु आहे. एकूण उपलब्ध पाण्याच्या ९७ टक्के पाणी समुद्राचे खारे पाणी आहे. उरलेल्या तीन टक्क्यांपैकी दोन टक्के हिमनद्या व ध्रुवीय प्रदेशातील बर्फामध्ये आहे. मानवी उपयोगासाठी फक्त एक टक्का पाणी उपलब्ध आहे. त्यापैकी ०.६२ टक्के सहज उपलब्ध आहे, तर ०.३८ टक्के पाणी भूगर्भात ८०० मीटरपेक्षा खोल सामावले आहे.

उपलब्ध पाण्यापैकी चार टक्के पाणी आपल्या देशाच्या वाट्याला आले आहे. एकंदर जगाच्या पृष्ठभागाच्या दोन टक्के जमीन आणि १७ टक्के लोकसंख्या, तसेच १५ टक्के गाई – गुरांची संख्या आपल्या देशातच आहे, त्यामुळे भूमीवर आणि जलस्त्रोतावर प्रचंड दबाव पडतोय. देशात सरासरी ११७० मी.मी. आणि महाराष्ट्रात १२५० मि.मी. पाऊस पडतो, तो पुरेसा असल्याचे भासते, आपल्याकडे पडणारा पाऊस अत्यंत बेभरवशाचा आणि लहरी आहे. देशात दर वर्षी जवळ–जवळ ४०० दशलक्ष हेक्टर मीटर पाणी पावसाद्वारे मिळते. यापैकी सुमारे १८७ दशलक्ष हेक्टर पाणी पावसाद्वारे मिळते. यापैकी सुमारे १८७ दशलक्ष हेक्टर मीटर पाणी पावसाद्वारे मिळते. यापैकी सुमारे दर वर्षी दर माणशी सुमारे १९०० घनमीटर पाणी वाट्यास

येते. वाढती लोकसंख्या आणि पाण्याची कमी होत जाणारी उपलब्धता पुढील कोष्टकावरुन सहज स्पष्ट होते.

| सन | लोकसंख्या (कोटींमध्ये) | पाण्याची उपलब्धता (घनमीटरमध्ये) |
|---|---|---|
| १९५१ | ३६.१ | ५१७७ |
| १९९१ | ८४.६ | २२०७ |
| २००१ | १०२.७ | १८२० |
| २०२५ | १४१.४ (अंदाजे) | १३४१ |
| २०५० | १६४.० (अंदाजे) | ११४० |

जेथे दरडोई १००० घनमीटरपेक्षा पाणी कमी आहे किंवा शेतीच्या संदर्भात दर हेक्टरी ३००० घनमीटरपेक्षा पाणी कमी आहे. तेथील पाण्याचे व्यवस्थापन समाधानकारक स्तरावर आणणे अतिशय अवघड आहे. महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रफळ ३०७ लाख हेक्टर असून, जलसंपत्ती सुमारे ४३५० टीएमसी आहे.

देशातील पाण्याची भावी गरज लक्षात घेता खालील स्वरुपाचे निर्णय राबविणे आवश्यक आहे.

पाणी ही एक राष्ट्रीय तसेच नैसर्गिक संपत्ती आहे. पाण्याची मालकी सर्व सामाजाची आणि देशातील सर्व लोकांची आहे, याची जाण प्रत्येकाला हवी.

पिण्याच्या पाण्याची टंचाई, तसेच दुष्काळावर मात करण्यासाठी पावसाचा थेंब अन् थेंब अडविणे, त्यांना मुरविणे यासाठी शास्त्रोक्त पाणलोट विकास कार्यक्रम राबविणे हा एकमेव मार्ग आहे.

पाण्याचा प्रत्यक्ष वापर करणाऱ्यांकडून पाणी वापराबाबत योग्य तो अधिकार वसूल करता यावा यासाठी लाभधारकांच्या पाणीवापर संस्था स्थापन करण्यात याव्यात.

शेतीसाठी पाणीवापर करताना तुषार अथवा ठिबक प्रणालीचा वापर बंधनकारक असावा.

भूगर्भातील जलसाठ्याचे पुनर्भरण न करता पाणी उपसणे हा गंभीर गुन्हा समजला जावा.

जलसाक्षरतेच्या माध्यमातून खालील गोष्टीचे ज्ञान लोकांपर्यंत पोचविले पाहिजे :-

- ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासाठी येणाऱ्या अडचणी व उपाय.
- शहरी भागात पाण्याचा होणारा अतिरिक्त वापर व उपाय.
- शेतीची सध्याची प्रचलित सिंचन पद्धती त्यामुळे होणारे नुकसान, सुधारित सिंचन पद्धती, फायदे आणि उत्पादनात वाढ.
- औद्योगिकारणांमुळे वापर, त्यामुळे होणारे प्रदूषण व वाढ.
- बाष्पीभवनामुळे वाया जाणारे पाणी.
- पाणी पुनर्भरण, पाणी अडवा, पाणी जिरवा, पाणी साठवा व्यक्तीगत पातळीवर पाण्याचा जपून वापर.
- लाखो, करोडो सुशिक्षित कुटुंबात सकाळी कितीतरी लिटर पाणी शिळे झाले म्हणून गटारात टाकण्यासाठी मोरीत सोडले जाते. परंतु जलाशयात महिनो न महिने साठविलेले पाणी नळाच्या तोटीतून घरात ताजे पाणी म्हणून प्रवेश करते, हे ओरडून सांगणे म्हणजेच जलसाक्षरता.

रस्त्याच्या कडेला सार्वजनिक नळाची रात्रभर चालू राहिलेली तोटी जाता जाता वाटेत थांबून बंद करावीशी वाटणे म्हणजेच जलसाक्षरता.

सकाळी सकाळी बेसीनचा चालणारा अखंड नळ किंवा बाथरुममध्ये कपडे धुताना धो – धो वाहणारा नळ गरजेपुरता जरी वापरला तरीसुद्धा लाखो लीटर पाण्याची बचत सहज होऊ शकेल.

◆◆◆



# जलसाक्षरता : काल, आज आणि उद्या

■ कोटंबे दिशा
बी.ए. (प्रथम वर्ष)

‘दोन जागतिक महायुद्धानंतर जग आता दुसऱ्या महायुद्धाच्या प्रतीक्षेत असून, हे तिसरे महायुद्ध दुसरे तिसरे कशासाठी नाही ; तर पाण्यासाठी होणार आहे..!’

अशी युगवाणी अनेक दिवसांपासून आपण ऐकत आहोत पाणी म्हणजेच जीवन. पाणी हा एक नैसर्गिक स्त्रोत असून, जगाच्या स्थापनेच्या आरंभीच निसर्गाने त्याची मुबलक प्रमाणात निर्मिती केलेली आहे. जगाचा एक नियम आहे, तो म्हणजे उत्पत्ती– स्थिती– आणि लय नियमा प्रमाणे पाण्याचाही अंत होणार आहे. जीजी वस्तू निर्माण झाली, तिचा विकास होतो आणि शेवटी तिचा अंतही होतोच. कधी ना कधी एक वेळ अशी येणार आहे, की जेव्हा जगातील सर्व पाणी संपलेले असेल. पाण्या विना सृष्टी ही कल्पनाच अंगावर काटे उभे करणारी आहे. पण हे वास्तव आहे. म्हणून पाणी संपू नये आणि त्यामुळे जीवन संपू नये, असे ज्यांना ज्यांना वाटते त्या प्रत्येकाने आतापासूनच पाणी वाचविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

आपण ‘अक्षरांची साक्षरता ’ म्हणतो; परंतु आता ‘पाण्याची साक्षरता’ समाजात निर्माणकरण्याची कधी नव्हे एवढी मोठी गरज निर्माण झाली आहे.पाण्याविषयी समाजात जागृती निर्माण करणे, यालाच पारिभाषिक शब्दांमध्ये ‘जलसाक्षरता’ असे म्हटले जाते. अक्षरांची साक्षरता निर्माण व्हावी यासाठी सरकारने आणि समाजानेही एकत्रित येऊन प्रयत्न केले आणि मोठ्या प्रमाणावर अक्षरांची साक्षरता निर्माण केली, त्याच प्रमाणे आता निसर्गाच्या कुशीत असलेल्या पाण्याचे साठे वाचविण्यासाठी समाजात मोठ्या प्रमाणावर चळवळ सुरू केली पाहिजे. शासनाची वाट न पाहता ‘पाणीवाचवा – जीवनवाचवा’ ही मोहीम हाती घेतली पाहिजे. यासाठी पहिल्यांदा विद्यार्थी व शिक्षक वर्गाने पुढाकार घेतला पाहिजे असे मला प्रामाणिकपणे वाटते. कारण आजच्या

संभ्रमाच्या काळात आणि गुंतागुंतीच्या राजकीय परिस्थितीत ही लोकांचा शिक्षण, शिक्षक आणि विद्यार्थी वर्गावर विश्वास आहे. शिवाय ज्याला जास्त कळते, त्यानेच पुढे होऊन समाजाला प्रगतीची दिशा दाखवीत आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे.

म्हणून या माध्यमातून मी माझ्या भावांना आणि बहिणींना, मित्र आणि मैत्रिणींना असे आवाहन करते की, आपण सर्वांनी एकत्र येऊन काम करण्याची वेळ आली आहे. तरीही आपण आपल्या परीने देशातील जलसाक्षरता चळवळीत योगदान दिले पाहिजे. 'पाणीवाचवा देशवाचवा'; 'जल है तो कल है' हे सांगण्याची चळवळ आपण आपल्या घरापासून सुरुवात केली पाहिजे.

मित्रहो, आपण ज्याशाळेत, महाविद्यालयात शिक्षण घेतोते तेथील गुरुजनांनाही आपल्यासोबत घेतले पाहिजे. आणि आपापल्या गल्लीमध्ये, मोहल्ल्यामध्ये , गावामध्ये जल साक्षरतेचे महत्त्व पटवून सांगण्यासाठी विविध कलापथकांच्या माध्यमातून, पथनाट्याच्या माध्यमातून, गायनातून आणि भाषणांतून पाण्याचे महत्त्व सांगितले पाहिजे. मला खात्री आहे, की लोक अजूनही आपले ऐकतील...! कारण लोकांचा विद्यार्थ्यांवर, शिक्षकांवर आणि शिक्षणावर अजूनही पूर्णपणे विश्वास आहे. हा विश्वास आपण सार्थ करुयात. जगातील जीवजंतू वाचविण्यासाठी, आणि हे जग सुंदर करण्यासाठी जलसाक्षरतेची चळवळ उभा करूयात. आपला वेळ, आपली बुद्धी आणि आपला पैसा या चळवळीसाठी खर्च करू यात. हे जग सुंदर करण्यासाठी प्रयत्न सुरू करुयात. एवढेच नम्र आवाहन करते. धन्यवाद.

◆◆◆



# जल व्यवस्थापनाची गरज

■ ससाणे मेघा
बी.ए. (तृतीय वर्ष)

भारतात मूलभूत सोयीसुविधांची मोठ्या प्रमाणात वानवा आहे. त्यातच पाण्यासारख्या अत्यावश्यक घटकाची येत्या १०वर्षात मोठ्या प्रमाणात टंचाई भासणार असल्याचे अलीकडे सादर करण्यात आलेल्या भारतीय जलउद्योगांच्या सर्वेक्षणातून समोर आले आहे. भारत हा नैसर्गिक साधनसंपत्तीने विपुल असा देश आहे. त्यात भारतात सरासरी पावसाचे प्रमाणही चांगले आहे; परंतु या पडणाऱ्या पाण्याचे योग्य नियोजन केल्यामुळे हे पाणी जमिनीवर पडून वाहून जाते. ते अडवले जात नसल्यामुळे ते थेट नदी, नाले किंवा समुद्राला जाऊन मिळते. त्याचा काहीच फायदा होत नाही. शेतीला पावसाळ्यात मिळणारे पाणी ही जमेची बाब सोडली तर पावसाचा फारसा उपयोग भारतात होत नाही. तो करता येत नाही कारण शेतीसाठी पाऊस हे समीकरण मान्य केले तरी इतर सगळ्या गोष्टींसाठी पाणी लागते, हे समीकरण लोक मान्य करायला तयार नाहीत. त्यांची तशी मानसिकता बनत नाही, ही भयंकर गोष्ट आहे. गेल्या काही वर्षात लोकांचा सरकारवर अवलंबून राहण्याची मानसिकता वाढलेली आहे. सरकार करेल, त्यांनी करावे, अशी मानसिकता आता कालबाह्य झाली पाहिजे. शेतीसाठी जसे पाणी लागते त्याच प्रकारे घरगुती आणि घराबाहेर उद्योग धंदे तसेच इतर वापरासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर केला जातो. पण शेतीशिवाय विहिरी, धरणे, कालवे यांच्यात पावसाचे पडणारे पाणी असते. त्या व्यतिरिक्त शहरे आणि ग्रामीण भागांसाठी वर्षभर पाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे, ते होत नाही. भारतात जलप्रदूषणाचे प्रमाण इतके वाढलेले आहे की, त्यामुळे देशभरातील नद्या, कालवे आणि शहरांच्या मध्यभागी असलेल्या विहिरी आता प्रदूषित झालेल्या आहेत. शहरातील सांडपाणी आणि उद्योग धंद्यातील प्रक्रिया

न केलेले रसायनमिश्रित पाणी यामुळे जलप्रदूषण वाढले आहे. पण हे जलप्रदूषण कमीकरून जमिनीतील जलपुनर्भरण वाढवणे आवश्यक आहे, ते होत नाही. शेती आणि उद्योगासाठी पाण्याचा बेसुमार उपसा होतो. पण धरणे, विहिरी, कालवे यातील पाण्याचे पुनर्भरण होत नाही. हे वाढवणे आवश्यक आहे. लोकसंख्येचे वाढते प्रमाण लक्षात घेता आणि लोकांची मानसिकता लक्षात घेता येत्या काळात भारतीयांनी आपली मानसिकता बदलणे आवश्यक आहे. पाण्याचे जमिनीतील पुनर्भरण तसेच पाण्याचा पुनर्वापर तसेच वर्षा जलसंचयनाचे प्रमाण वाढवणे आवश्यक आहे. पाण्याबाबत लोकांचा दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे. पाण्याचा उपसा कमी करून जलप्रदूषणाबाबत कठोर कायदा आणि त्याची कठोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. आज शहरी आणि ग्रामीण भागात एक लीटरची पाण्याची बाटली २० ते २५ रुपयांना विकली जात आहे. हे बाटलीबंद पाणी विकत घेण्याची लोकांची मानसिकता बनली आहे. पण जलव्यवस्थापन करण्यासाठी पुढाकार घ्यावा. शहरी आणि ग्रामीण भागात सरकार आणि स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने हे काम मार्गी लावणे आवश्यक आहे. पुढील १०वर्षात भीषण पाणीटंचाई होणारा देश म्हणून भारताकडे बोट दाखवले जात आहे. आधीच राज्याअंतर्गत आणि राज्यांराज्यांमध्ये पाणीप्रश्न पेटला असून हा प्रश्न जटील बनू लागला आहे. त्यामुळे येत्या १०वर्षात पाणी प्रश्न अधिक समस्यांना जन्म देणारा ठरणार आहे. खाऱ्या पाण्याला पिण्यायोग्य पाणी बनवण्याचे प्रयोग सुरू आहेत. परंतु ते फार खर्चिक असल्यामुळे ते भारतासारख्या देशाला परवडणारे नाहीत. म्हणून जलव्यवस्थापन करताना सर्वच पातळीवर लोकांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. जलसाक्षरता आणि त्यातून येणारे जलव्यवस्थापन ही काळाची गरज आहे. त्यासाठी लोकांनी आपल्या मानसिकतेत बदल घडवून आणणे आवश्यक आहे.

◆◆◆

# पाणी म्हणजे अर्थातच जीवन !

■ कु.दोडे गीता व्यंकटराव
बी.ए. (तृतीय वर्ष)

रोज वापरण्यात येणारे पाणी व्यक्तीपरत्वे वेगवेगळ्या प्रमाणात असेल परंतु त्याचा सुयोग्य वापर करणे आज कर्तव्य बनून गेले आहे. सकाळपासून रात्री झोपेपर्यंत एक व्यक्ती जेवढे पाणी वापरतो, त्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे.

दैनंदिन कामात पाण्याचा वापर वाढत चाललेला आहे. पाणी सर्व कामांसाठी गरजेचे देखील आहे पण त्याचा अपव्यय होत असल्यास काय करावे लागेल, याचा गंभीरतेने विचार केला पाहिजे. आज लोकसंख्या आणि जलप्रदूषण या समस्या भेडसावत असल्याने पाण्याचा नियंत्रित वापर ही काळाची गरज होऊन बसली आहे.

प्रत्येक शासकीय यंत्रणा ही जलसंधारणबाबतीत विचार करतेच आणि त्याबाबत धोरण आणि योजना ठरवत असते. लोकसंख्या, उपलब्ध जलस्त्रोत आणि त्याचे नियोजन व पुरवठा या सर्व गोष्टी सरकारला स्वत:च्या धोरणात ठरवाव्या लागतात.

पाऊस ज्या क्षेत्रात जास्त पडतो तेथे जल प्रकल्प उभारणे आणि जेथे दुष्काळ किंवा पाणी टंचाई असते, त्या विभागात पाणीपुरवठा करणे अशा धोरणांनी जलसंधारण यशस्वी ठरत असते. धरणांमुळे शेतीविकास शक्य झाला. आज शेतीवर उपजीविका करून लोक एक चांगले आयुष्य जगत आहेत.

मागील दोन दशकांत भारत देशात झालेले प्रयत्न उल्लेखनीय असे आहेत. भारतात तरी वीज निर्मिती आणि पाणी पुरवठा योजना योग्य प्रकारे अंमलात आणल्या जात आहेत. मोठ्या नद्यांवर उभारलेले वीजप्रकल्प आणि धरणे यांमार्फत त्यासंपूर्ण राज्यातील वीज समस्या टाळली गेली आहे.

जलसंधारण किंवा जलनियोजन करण्यासाठी पाणी बारामहिने उपलब्ध असणे आवश्यक आहे. सध्या निसर्गाचा समतोल ढासळत आहे. त्यावरील कारणे शोधताना आपण लोकसंख्यादेखील विचारात घेतली पाहिजे. जंगले का तोडली जात आहेत? पाणी का दूषित बनत चालले आहे? अशा काही प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतील.

जलप्रदूषण आणि नियोजनातील इतर अडथळे दूर सारून जलसंधारण व्यवस्थितरीत्या राबवता येईल. कोणत्याही राज्याच्या विकासात उद्योग धंदे, शेती, आणि विज्ञान – तंत्रज्ञान यांची मोलाची साथ मिळत असते. अशा उत्पन्नाच्या साधनांना पाणी उपलब्ध करून देणे यासाठी जलसंधारण करणे आवश्यक आहे.

जलसंधारण करताना भौगोलिक आधार लक्षात घ्यावा लागतो. निसर्गनिर्मित सरोवरे, तळी, नाले यांचाही विचार करावा लागतो कारण बारा महिने पाणी पुरवण्यासाठी त्यांचा उपयोग होत असतो. अशा प्रदेशात पाणी अडवा – पाणीजिरवा, शेततळे, डोंगरांवर चऱ्या खोदणे, असे प्रकल्प उभारल्यास तेथील भू–क्षेत्र आणखी विकसित होऊ शकते.

भूगर्भातील पाण्यामुळे आपण नेहमीच उत्तम शेती करू शकलो आहे. त्यासाठी त्या क्षेत्रात पाणी जिरवणे खूप आवश्यक ठरते. त्यासाठी जलसंधारण करताना पाणी जमिनीत जिरवणे, पावसाळ्यात पाणी जास्त वाया जाऊ न देता ते साठवणे अशाप्रकारच्या उपाययोजना केल्या जातात.

भूगर्भात जलसाठा वाढवणे, पाण्याचा वापर सुयोग्य पद्धतीने करणे, पाणीपुरवठा, पाणी नियोजन, पाणी प्रदूषण प्रतिबंध अशा काही संकल्पना जलसंधारण करताना आवश्यक ठरतात. सरकार अशा योजना आणि प्रकल्प राबवत असते.

◆◆◆

# ‘जल प्रदूषण ’

■ कु. नरवटे वर्षाराणी किशनराव
बी.ए. (द्वितीय वर्ष)

जल प्रदूषण भारत में व्याप्त सबसे बड़े संकटों में से एक है। इसका सबसे बड़ा स्त्रोत है – बिना ट्रीटमेंट किया सीवेजका पानी। यह साफ दिखता है। इसे देखनेके लिए ज्यादा मेहनत करनेकी जरूरत नहीं है। प्रदूषण के कई अन्य स्त्रोत भी हैं। जैसे – खेतों से आता पानी, छोटे और अनियंत्रित उद्योगों से आनेवाला पानी। हालात इतने गंभीर हैं किं भारत में कोई भी ऐसा जल स्त्रोत नहीं बचा है, जो जरा भी प्रदूषित न हो। हकीकत तो यह है कि देश के ८० प्रतिशत से ज्यादा जलस्त्रोत बहुत ज्यादा प्रदूषित होचुके हैं। इन में भी वह जलस्त्रोत ज्यादा प्रदूषित हैं, जिनके आसपास बड़ी संख्या में आबादी रहती है। गंगा और यमुना भारत की सबसे प्रदूषित नदियों में से एक है। कखग भारत में जल प्रदूषण के कारण शहरीकरण और उसकी अनियंत्रित दर है। पिछले एक दशक में शहरीकरण की दर बहुत तेज गति से बढ़ी है या हम ऐसा भी कह सकते हैं कि इस शहरीकरण ने देश के जलस्त्रोतों पर अपनी अमिट छाप छोड़ी है। इसकी वजह से लंबी अवधि के लिए कई पर्यावरणीय समस्याएँ पैदा हो गई हैं। इनमें जलआपूर्तिकी कमी, पानी के प्रदूषित होने और उसके संग्रहण जैसे पहलू प्रमुख हैं। इस संबंधमें प्रदूषित पानीका निपटान और ट्रीटमेंट एक बहुत बड़ा मुद्दा है। नदियों के पास कई शहर और कस्बे हैं जिन्होंने इन समस्याओं को बढ़ाने में कोई कसर नहीं छोड़ी है।

इन इलाकों में अनियंत्रित शहरीकरण से सीवेज का पानी बह रहा है। शहरी इलाकों में नदियों, तालाबों, नहरों, कुओं और झीलों के पानी का इस्तेमाल घरेलू और औद्योगिक आवश्यकताओं लिए होता है। हमारे घरेलू इस्तेमाल का ८० % पानी खराब हो जाता है। ज्यादातर मामलों में पानी का ट्रीटमेंट अच्छे से नहीं होता और इस तरह जमीनकी सतह पर बहने वाले ताजे पानी को प्रदूषित करता है। यह प्रदूषित जल सतह से गुजरकर भूजल में भी जहर घोल रहा है। एक अनुमान के मुताबिक एक लाख से ज्यादा आबादी वाले शहरों में १६,६६२ मिलियन लीटर खराब पानी एक दिन में निकलता है। आश्चर्य इस बात का है कि इन शहरों के ७० प्रतिशत लोगोंको सीवेज की सुविधा मिली हुई है। गंगा नदी के किनारों पर बसे शहरों और कस्बों में देशका करीब ३३ % खराब पानी पैदा होता है।

भारत में जलप्रदूषण के बढ़ते स्तर के प्रमुख कारण निम्नानुसारहैं : –

१– औद्योगिक कूड़ा
२– कृषिक्षेत्रमें अनुचित गतिविधियाँ
३– मैदानी इलाकों में बहनेवाली नदियों के पानी की गुणवत्ता में कमी
४– सामाजिक और धार्मिक रीति–रिवाज जैसे पानी में शवको बहाने, नहाने, कचरा फेंकने आदि.
५– जहाजों से होनेवाला तेल का रिसाव
६– एसिड रैन (एसिड की बारिश)
७– ग्लोबल वार्मिंग
८– यूट्रोफिकेशन
९– औद्योगिक कचरे के निपटान की अपर्याप्त व्यवस्था
१०– डीनाइट्रिफिकेशन

इस प्रकार जलप्रदूषण के उपर्युक्त प्रकार बताये जा सकते है।

◆◆◆




■ कु.मुसळे अल्का पंडित
बी.ए. (तृतीय वर्ष)

जिस जलस्त्रोत का पानी जरा-भी प्रदूषित होता है, उसके आसपास रहनेवाले प्रत्येक जीवन पर जलप्रदूषण का किसी न किसी हद तक प्रतिकूल प्रभाव पड़ता है। एक निश्चित स्तरपर प्रदूषित पानी फसलोंके लिए भी नुकसानदेह साबित होता है। इससे जमीन कीउर्वरक क्षमता कम होती है। कुलमिलाकर कृषिक्षेत्र और देश को भी प्रभावित करता है। समुद्र का पानी प्रदूषित होता है तो उसका बुरा असर समुद्री जीवन पर भी होता है। जल प्रदूषण का सबसे बड़ा कारण पानी की क्वालिटी में गिरावट होती है। इसके सेवन से कई तरह की बीमारियाँ हो सकती हैं।

हकीकत तो यह है कि भारत में, खासकर ग्रामीण इलाकों में स्वास्थ्य के निम्न स्तर का एक बड़ा कारण जलप्रदूषण ही है। प्रदूषित पानी की वजह से कॉलरा, टीबी, दस्त, पीलिया, उल्टी- जैसी बीमारियाँ हो सकती हैं। भारत में पेटके विकारों से पीड़ित ८० % मरीज प्रदूषित पानी पीने की वजह से बीमार हुए हैं।

**भारत में जलप्रदूषण को दूर करने के उपाय :**

जल प्रदूषण का सबसे अच्छा समाधान है - इसे न होने देना। इसका सबसे प्रमुख समाधान है मिट्टी का संरक्षण। मिट्टी के कटाव की वजह से भी जल प्रदूषित होता है। ऐसे में, यदि मिट्टी का संरक्षण होता है तो हम कुछ हद तक पानी का प्रदूषण रोक सकते हैं। हम ज्यादा से ज्यादा पौधे या पेड़ लगाकर मिट्टीके कटाव को रोक सकते हैं। खेती के ऐसे तरीके अपना सकते हैं जो मिट्टी की उर्वरता की चिंता करें और उसे बिगाड़ने के बजाय सुधारें। इसके साथ ही जहरीले कचरे के निपटाने के सही तरीकों को अपनाना भी बेहद महत्वपूर्ण है। शुरुआत में हम ऐसे उत्पादों का

इस्तेमाल न करें या कम करें जिनमें उन्हें नुकसान पहुंचाने वाले जैविक यौगिक शामिल हों। जिन मामलों में पेंट्स, साफ-सफाई और दाग मिटाने वाले रसायनों का इस्तेमाल किया जाता है, वहाँ पानी का सुरक्षित निपटान बेहद जरूरी है। कार या अन्य मशीनोंसे होनेवाले तेल के रिसाव पर ध्यान देना भी बेहद जरूरी है।

यह कहा जाता है कि कारों या मशीनों से निकलनेवाला- तेल का रिसाव भी जलप्रदूषण के प्रमुख कारणों में से एक है। इस वजह से कारों और मशीनों की देख भाल करना बेहद जरूरी है। नियमित रूप से यह देखा जाए कि तेल का रिसाव तो नहीं हो रहा। काम पूरा होने के बाद -खासकर जिन फैक्टरियों और कारखानों में तेल का इस्तेमाल होता है। खराब तेल को साफ कर नया सुरक्षित निपटान या बाद में इस्तेमाल के लिए रखनेमें सावधानी बरतनी जरूरी है। यहाँ हम नीचे कुछ तरीके बता रहे हैं जिनके जरिए इस समस्या को दूर किया जा सकता है -

१- पानी के रास्ते और समुद्रीत टोंकी सफाई

२- प्लास्टिक जैसे जैविक तौर पर नष्ट न होने वाले पदार्थों का इस्तेमाल न करें

३- जल प्रदूषण को कम करने के तरीकों पर काम करें

भारत में जल प्रदूषण को दूर करने की सही समाधानकारक और प्रयास किये जा सकते हैं जिसका उल्लेख मैने उपर्युक्त परिच्छेद मे किया है। जल प्रदूषण यह एक बहुत बडी समस्या है, इस समस्या का निवारण मनुष्य ही कर सकते हैं । क्योंकि समस्या का निर्माण ही मनुष्य ने किया है। मैंने की उपाय बताये जल प्रदूषण को दूर करने के लिए इससे हमारा देश जल प्रदूषण मुक्त होगा ऐसा मुझे विश्वास है।

◆◆◆

# जलम् एवं जीवनम्

■ कु. केजकर गीतांजली
संस्कृत, बी.ए. (तृतीय वर्ष)

पृथिव्यां जलं पर्याप्तम् अस्ति। अत:पृथिवी नीलग्रह:इति उच्यते। जलं निरन्तरं स्वरूपं परिवर्तते। सूर्यस्य तापेन वाष्पस्वरूपं, शीतले सति सङ्घनीकरणे मेघस्वरूपं, वर्षामाध्यमे न जलस्वरूपं धरति। जलं महासागरेषु, वायुमण्डले, पृथिव्यां च परिभ्रमति। जलस्य तत्परिभ्रमणं जल चक्रं कथ्यते।

जलम् एव जीवनम् इति उक्त्यनुसारम् अस्माकं जीवने जलस्य आवश्यकता वर्तते। जीवनाय जलम् आवश्यकं वर्तते। तृष्णायां सत्यां जलेन एव निवारणं भवति। पृथिव्या: जीवानां कृते आवश्यकंतत्त्वम् अस्ति जलम्। अस्माकं सौभाग्यम् अस्ति यत्पृथिवी जलीय:ग्रह: वर्तते। जलंसौरमण्डले दुर्लभं वर्तते। अन्यत्र कुत्रापि जलं नास्ति।

अस्माकं पृथिवी स्थलशाला इव अस्ति। अलवणस्य जलस्य मुख्यं स्रोत:नदी, तडाग:, हिम नदी च वर्तते। महासागराणां, समुद्राणां च जलं लावण्यं वर्तते। तस्मि जले सोडियम्क्लोराइड्, पाचक लवणं च प्राप्यते। जलम् एकं चक्रीय संसाधनं वर्तते। पौन:पुन्येन जलस्यउपयोग:क्रियते। अस्मिजलचक्रे जलं महासागरत:धरातलं, धरातलत: महासागरं प्राप्नोति। इदं चक्रं सततं कार्यरतम् अस्ति। पृथिव्यां जीवनाय आवश्यकतत्त्वंवर्तते। जलस्यवितरणं पृथिव्याम् असमानम् अस्ति। केषुचि तक्षेत्रेषुजलम् अधिकमात्रायां प्राप्यते।

# जलसंधारणस्य महत्त्वम्

■ कु.पोले कोमल संभाजी
संस्कृत, बी. ए. (तृतीय वर्ष)

महाराष्ट्रप्रान्तस्य कृषि: पर्जन्याधारित: अस्ति। महाराष्ट्र प्रान्ते कृषिकृते पर्याप्तं जलं नास्ति। अस्मिन प्रान्ते जलसंधारणस्य अतीव उपयुक्तं कार्यंसुधाकर: नाईकमहोदयेन कृतं। अत: तस्य स्मरनार्थं १० मेदिने जलसंधारण दिनं इति मत्वा सर्जरिकरोति।

सुधाकर: नाईक महोदये न महाराष्ट्र प्रान्ते जलसंधारणस्य विविधानि उपक्रमानि आयोजितवान आसीत। तेन महाराष्ट्रप्रान्ते जलसंधारणस्य स्वतंत्रं विभागं निर्माणं कृतम्। इदं भारतदेशस्य प्रथममेव विभागं मंत्रालये निर्मितं आसीत। जलस्य न्यूनत्वं तथा अकाल निवारणार्थंतेन अनेकानिकार्यं साहसेन कृतम्। तस्य जलसंधारणस्य धोरणं, कार्यंत था परिश्रमं अद्यपि आदरेण स्मतम्।

कृषिकृतेअनेकानिविघ्नानि सन्ति। तस्य निवारणार्थं जलसंधारणं, पाणलोटं आदि उत्तमानि मार्गानि सन्ति। जलसंधारण विभागे विविधार्नि नि उपायानां प्रयोगं कुर्वन्ति। महाराष्ट्रप्रान्ते पाणी 'आडवा पाणी जिरवा' इतिविषयं अनुसृत्य 'जलयुक्तश्विार' आदि अभियानानांप्रयोगंकृतमासीत। जिल्हा परिषदे अपि जलसंधारणस्य समितीं अस्ति। पर्जन्यस्य जलस्य रक्षणं कृत्वा तस्य उपयोजनं कृत्वा पृथ्व्या: भूजलस्य जलस्तरवर्धनं कुर्याम।

◆◆◆




■ **Chaus Sumiya A.Rauf**
B.A. (Third Year)

Water, is the basic need of every life on earth. It is water that helps us to lead a comfortable life on this planet. Our body is up of 70% of water, which is why water is such an important component for us.

We can conserve water using simple steps like using a bucket instead of shower while bathing. The industries also consume a great deal of water on a large scale for almost every step of your process, you need water.

One of the most important things is that the lack of sufficient water can cause serious health problems for humans. Therefore, the amount and quality of water which we consume is essential for our physical health plus fitness. Uses of water include agriculture,industrial, household, recreational and environmental activities. Water is the foundation of our life as we think about our personal lives. Your body uses water in all its cells, organs and tissues to help the regulate its temperature and maintain body functions. Our mother earth will not exist without water.

About 40 million peoples in Canada & the United States depends on the on the largest fresh water system in the world known as the great lakes for water.

Future wars are likely to stem from a desire to control sufficient water resources. The concept of trinity revolves around water resources world ocean cover about the three fourth of earth's surface.According to UN estimates, total amount of water on earth is about 1400 million cubic kilometers which is enough to cover the earth with a layer of 3000 (meters) in depth.

